# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**<u>प्रसिद्धी पत्रक                                        ता. १३ सप्टेंबर २०१९</u>**

# बालकांच्या जन्म नोंदणीची अट शिथिल

**नागपूर, ता. १३ :** महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० नुसार जन्म नोंदणीमध्ये नाव समाविष्ठ करण्याकरिता १५ वर्षाची अट शिथिल करण्यात आली आहे. त्यानुसार जन्म नोंदणी न झालेल्या १५ वर्षापूर्वी जन्माला आलेल्या बालकांची १४ मे २०२० पर्यंतच्या कालावधीमध्ये जन्म नोंदणी करता येणार आहे.

याशिवाय १ जानेवारी २००० पूर्वी झालेल्या नोंदणीमध्ये सुद्धा नाव समाविष्ठ करता येईल. याकरिता नागरिकांना १४ मे २०२० या कालावधीमध्ये बालकांचे जन्म नोंदणीमध्ये नाव समाविष्ठ करण्याकरिता संबंधित कार्यालयात अर्ज व शाळा सोडल्याच्या दाखल्यासह मनपाच्या संबंधित कार्यालयात संपर्क साधता येईल. सादर करण्यात येणा-या दस्तावेजामध्ये जन्म नोंदणीत नमुद जन्म दिनांक व शाळा सोडल्याच्या दाखल्यावर नमुद जन्म दिनांक सारखी असणे आवश्यक आहे. नागरिकांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.